दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर

द म सा

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

Scanned by CamScanner

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(मराठी त्रैमासिक)

जुलै- ऑगस्ट- सप्टेंबर २०१५

वर्ष : ३३ / अंक २ रा

संपादक : चंद्रकुमार नलगे

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ, राज्य शासन सहमत असेलच असे नाही.
- या अंकाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त.

अक्षरजुळणी : वैभव ग्राफीक्स, कोल्हापूर, फोन: ८८०५००८९७५

मुद्रक : गणेश प्रिंटर्स, कोल्हापूर, फोन : २६९५५४५

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


१) शिवारातला शब्द शिल्पकार – डॉ. द. ता. भोसले

२) १९७५ ते १९९० मधील ग्रामीण नाटक – डॉ. सुभाष गणपती जाधव

३) साहित्य निर्मितीतील स्वप्नव्यापार – डॉ. भाग्यश्री कुलकर्णी

४) आशापूर्णादेवींच्या अनुवादित कादंबऱ्या : स्त्रीजीवन आणि स्त्रीप्रश्न – प्रा. आबासाहेब उत्तम सरवदे

५) तथागत बुद्धांचे वर्णव्यवस्था निर्मुलनविषयक विचार – डॉ. प्रशांत गायकवाड

६) परिघावरच्या पाऊलखुणा : एक कलात्मक चिंतनाविष्कार – डॉ. सयाजीराजे आ. मोकाशी

७) वरुणाचे करुणोपनिषद : झड झिंबड – संदीप भुयेकर

८) ग्रामजीवनातील संघर्षाची पाऊले : 'अनवाणी पाय' – रमजान मुल्ला

९) धम्मपाल रत्नाकरांची 'आत्मकथा' – डॉ. सर्जेराव पद्माकर

१०) बसवेश्वर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार – मीनाक्षी महारुद्र हिरेमठ


## कविता


शिरीष पै

फ. मुं. शिंदे

सुजाता पेंडसे

हेमंत डांगे


Scanned by CamScanner

# १९७५ ते १९९० मधील मराठी ग्रामीण नाटक

– डॉ. सुभाष गणपती जाधव

भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे भारतात पहिल्यापासूनच शेतीला महत्वाचे स्थान आहे. शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचा विकास झालेला नव्हता. भारतावर अनेकांनी राज्य केले. त्यामध्ये शेवटच्या कालखंडात इंग्रजांनी राज्य केले असले तरी त्यांच्यामुळे भारतीयांना फायदा झाला. कारण इंग्रजांची राज्य चालवण्यासाठी सुशिक्षित तरुणांची गरज होती. त्यामुळे त्यांनी भारतात शिक्षणाचा प्रसार केला. भारतातील लोक शिकू लागले. या काळात समाजात उच्चवर्णीय पांढपेशीय लोक शिक्षण घेऊन साहित्य लिहीत होते. मात्र खऱ्या समाज जीवनाचे दर्शन हे साहित्यातून इंग्रजांच्यामुळेच येऊ लागले.

अशा काळात समाजातील काही समाज सुधारकांनी जागृती करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले इत्यादींचे कार्य नजरेत भरते. ग्रामीण भागातील लोकांची उच्चवर्णीयांकडून होणारी मानसिक, आर्थिक पिळवणूक ही महात्मा फुले यांच्या लक्षात आली. पुढे ही पिळवणूक त्यांनी साहित्यातून मांडली. शिक्षणाची गरज ओळखून त्यासाठी प्रयत्न केले. विशेषत्वाने स्त्रीयांच्या शिक्षणासाठी स्वतःच्या पत्नीला सोबत घेऊन शिक्षणाचे कार्य सुरू केले. लोकांना शिक्षणाचे महत्व पटू लागले. याचा परिणाम असा झाला की, लोक शिकू लागले आणि वाङ्मय लेखनाला थोडीफार प्रेरणा मिळाली. इ. स. १९४७ ला देश स्वतंत्र झाला आणि शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र देऊन समाजाला प्रेरणा दिली. यामुळे लोक शिकू लागले. त्यांची अस्मिता जागी झाली. पुढील काळात सुशिक्षीत झालेले लोक आपले जीवनानुभव साहित्यातून शब्दांकित करू लागले. त्यांच्या जीवनविषयीच्या व्यथा वेदना साहित्यातून व्यक्त होऊ लागल्या.

शिक्षणाच्या प्रसारामुळे सुसंस्कारीत झालेली ही पहिली पिढी विचारप्रवृत्त झाली. आपणाच आपल्या व्यथा वेदनांना शब्दबद्ध केले पाहिजे हे त्यांना समजले. त्यामुळे त्यांनी लेखणी होती घेतली. एक ना दोन अशा अनेक कारणांनी समाजातील



Scanned by CamScanner

सर्वसामान्य लोक शिक्षणाने जागृत झाले. विपुल प्रमाणात लेखन लिहिले गेले. परिणामी साहित्यामध्ये नवनवीन साहित्याचे प्रवाह निर्माण झाले. जसे ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी. इ. स. १९६०च्या दरम्यान प्रामुख्याने ग्रामीण व दलित चळवळीतून विपुल प्रमाणात लेखन झालेले दिसते. प्रामुख्याने या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजातील लोकांना जागृत केल्याने दलित साहित्याची मोठी चळवळ उभी राहिली. दलित साहित्याचे मोठ्या प्रमाणात लेखन होऊ लागले. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मुख्य उद्दिष्टांना महत्व देऊन दलित साहित्याचे लेखन केले. या साहित्याच्या लेखनामागे विचार हाच मुख्य गाभा होता. दलित साहित्याबरोबरच या वेळी ग्रामीण साहित्यालाही प्रेरणा मिळाली. महात्मा फुलेंनी ग्रामीण जीवनाचे चित्रण स्वातंत्र्यपूर्व काळात करायला सुरुवात केली होती. पण ग्रामीण साहित्य म्हणून वाङ्मयाचा प्रवाह त्यावेळी निर्माण झालेला नव्हता. असे असले तरी ग्रामीण साहित्याची बीजे ही महात्मा फुले यांच्या साहित्यात दिसून येतात. कष्टकरी शेतकऱ्याचे शोषण शेठजी करतो. याचे हृदयद्रावक चित्रण महात्मा फुलेंनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातून मांडले. साहित्यातून शेतकऱ्याचे दयनीय स्थितीचे दर्शन प्रथम येथे दिसते. नंतरच्या काळात शेतकऱ्याच्या जीवनाची समाजाला ओळख होऊ लागली. पर्यायाने ग्रामीण साहित्याचा उदय स्वतंत्र्योत्तर काळात झाला. अडाणी गांवढळ म्हणून जी भाषा समजली जात होती तीच भाषा साहित्याची भाषा म्हणून समाजात रूढ होऊ लागली. पर्यायाने ग्रामीण साहित्याच्या लेखनाला चालना मिळाली.

इ. स. १९६५ नंतरच्या काळात ग्रामीण साहित्यावर अनेकांनी विविध ग्रंथांचे लेखन केले. ग्रामीण भागातील लोकांचे दु:ख, वेदना साहित्यातून मांडल्या जाऊ लागल्या. खऱ्या जीवनाची व साहित्याची समाजाला ओळख होऊ लागली. परिणामी ग्रामीण वाङ्मयाला चालना मिळून कथा, कादंबरी, काव्य असे विविध प्रकारच्या माध्यमातून लेखन झाले. हे लेखन होत असताना काही लेखकांनी ग्रामीण नाटकही लिहिले. साधारणपणे विचार करता या ग्रामीण नाटकाची सुरुवात ही महात्मा फुलेंच्या 'तृतीय रत्न' या नाटकापासून झालेली दिसते. ग्रामीण नाटकाचा विचार करता मराठी वाङ्मयात ग्रामीण नाटक म्हणून वेगळा अभ्यास केला जात नाही. ग्रामीण कादंबरी, ग्रामीण कविता, ग्रामीण कथा अभ्यासली जाते. पण ग्रामीण नाटक म्हणून अभ्यासले जात नाही. ते अभ्यासने काळाची गरज आहे. या अनुषंगाने येथे इ. स. १९७५ नंतरच्या ग्रामीण नाटकांच्या संहिता लेखनाचा आढावा घेता येतो.



Scanned by CamScanner

इ. स. १९७५ नंतर प्रामुख्याने वास्तव प्रश्न ग्रामीण नाटकातून मांडलेले दिसतात. यामध्ये प्रामुख्याने अण्णा भाऊ साठे यांचा उल्लेख येतो. यांनी इ. स. १९७६ मध्ये 'इनामदार' या नाटकातून ग्रामीण भागातील इनामदाराचे वास्तव दर्शी चित्रण केले आहे. खेडे गावात इनामदार असतात. ते इनामदार कसे झाले या प्रश्नाचे उत्तर शोधायचे झाले तर आपल्यासमोर प्रश्न उभा राहतो. कारण अण्णा भाऊ साठेंनी इनामदार या नाटकातून जो सामाजिक आशय मांडला आहे. त्यातून त्यांनी तो इनामदार गैर मार्गाने झाला आहे, हे स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे या इनामदाराबद्दल मनात अनेक शंका निर्माण होतात. कारण या नाटकामध्ये गोपाळराव हा इनामदार आहे. तो मुळचा इनामदार नसून अनेक लोकांना फसवून त्याने जमिनी बळकावल्या आहेत. त्यावरच तो शेतकऱ्यांना पुन्हा कर्जे देतो आणि त्यावर व्याज घेतो. दुर्दैवाने त्याच्या घराण्याला वारस नसतो. त्यामुळे तो अस्वस्थ असतो. या इनामदाराला मुनीम व गोविंदा भिडे हे दोघे जण गैरमार्ग करताना मदत करतात. मात्र ही गोष्ट मुकींदा, महिपती व राणुजी यांना मान्य नसते. ते अन्यायाविरुद्ध लढतात. त्यामुळे हे तिघेही गोपाळराव इनामदाराला दुश्मन वाटतात. गावातील सुख, शांती व्यवस्थित ठेवण्यासाठी मुकींदा प्रयत्न करतो. आपला गाव चांगला राहील, गावातील बारा बलुतेदारी कशी अबाधीत राहील याकडे त्यांचे लक्ष असते. म्हणजेच गावाचे ग्रामीणत्व टिकविण्याचा प्रयत्न येथे दिसतो.

लेखकाने या नाटकाच्या सुरुवातीला गोपाळरावला पडलेलं स्वप्न नाटकाच्या शेवटी सत्यात येते आणि नाटकाच्या आशयाला कलाटणी मिळते. या एका प्रसंगामुळे नाटकाची कलात्मक बाजू स्पष्ट होते. काही काळ अंधश्रद्धा म्हणून येणाऱ्या गोष्टी या ठिकाणी काळाने बांधलेल्या दिसतात. इनामदार हा आपली इनामदारी राखण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करू पहातो. मुकींदासारखे लोक समाज क्रांती करू पहातात. पण त्याचा मध्येच अन्त झाल्याने नाटकाच्या शेवटी गावकऱ्यांकडून नरशा दरोडेखोर मारला जातो. कारण नरशाने गोपाळरावच्या सांगण्यावरून मुकींदाला मारलेले असते आणि तोच पुन्हा गोपाळरावला ठार मारतो. मुकींदा हा समाजातील चांगल्या गोष्टी करणाऱ्याचा प्रतिनिधी म्हणून येतो. गोपाळराव सारखा एक व्यक्ती संपूर्ण गाव संकटात आणू शकतो, हे लेखकाने दाखवून पूर्वीचे इनामदार लोक कसे होते याचे वास्तववादी दर्शन घडविले आहे. हा सामाजिक पातळीवरील वास्तव प्रश्न मांडला आहे.

कमलाकर बोरकर यांनी 'डाकू मानसिंग' हे इ. स. १९७५ ला ग्रामीण नाटक



Scanned by CamScanner

लिहून डाकूच्या जीवनावर प्रकाश टाकलेला दिसतो. 'डाकू मानसिंग' हे एका प्रामाणिक दरोडेखोऱ्याच्या जीवनाची कहाणी सांगणारे नाटक आहे. इतर दरोडेखोरापेक्षा यातील दरोडेखारे वेगळा आहे. परिस्थितीने गांजलेल्या व इनामदाराच्या जुलमी वागणुकीमुळे मानाजी हा मानसिंग डाकू होतो. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा सूड आणि स्वत:च्या बापावर झालेल्या अन्यायाचा व नंतर झालेल्या त्याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी डाकू मानसिंग येथे येतो. तो इनामदाराचा सूड घेतो. हे मांडत असताना लेखक सुमित्रा सारख्या स्त्रीचा वापर करून तमाशा या. कलेची जोपासना करून तिची प्रेम कहाणी मांडतो.

'डाकू मानसिंग' हा कुशाबा सरनाईकाचा मुलगा असतो. इनामदार हा अनेकांच्यावर अन्याय, अत्याचार करतो. याचा बदला घेण्यासाठी डाकू मानसिंग येतो. तो जरी डाकू असला तरी तो गरिबांचा कैवारी म्हणून येतो. अन्यायाविरुद्ध लढा देणारा हा मानसिंग आहे. इनामदार मानसिंगला मारण्यासाठी सुमित्राचा वापर करतो. पण इथे उलटेच घडते. सुमित्रा इतरांना फसवू शकते. मात्र मानसिंगला फसवू शकत नाही. मानसिंगचे कार्य आणि त्याचा रुबाबदारपणा पाहून सुमित्रा त्याच्या प्रेमात पडते. आपण मानसिंगला मारण्यासाठी आलेलो आहोत हे ती विसरून जाते. मनापासून त्याच्यावर प्रेम करते. मानसिंगला मारण्यासाठी इनामदार चांग्या बेरडाला सुपारी देतो. तो सुमित्राला गुहेतून उचलून वाड्यात आणण्यात यशस्वी होतो. मात्र मानसिंगला मारण्यात अपयशी ठरतो. उलट तो मानसिंगच्या हातून मारला जातो. गरिबांचा कैवारी म्हणून अन्याया विरुद्ध लढणारा मानसिंग शेवटी इनामदाराला ठार मारतो. पोलिसांना सापडताच आपल्या हातातील बेड्या स्वत:च्या डोक्यात मारून घेऊन स्वत:च्या रक्ताने सुमित्राच्या कपाळी रक्ताचा टिळा लावतो. तिचा पत्नी म्हणून स्विकार करतो. असा हा आगळावेगळा दरोडेखारे बोरकरांनी उभा केला आहे. सुरुवातीला सुमित्राच्या प्रेमाला विरोध करणारा मानसिंग शेवटी सुमित्राच्या प्रेमाचा स्विकार करतो. सुमित्राला रक्ताचा टिळा कपाळी लावल्याने मानसिंग तिचा होतो आणि सुमित्राच्या प्रेमाचा विजय होतो.

दरोडेखोराच्या जीवनावर प्रकाश टाकणारे आणखी एक नाटक म्हणजे 'अंगार' अर्थात 'डोंगरचा राजा' हे इ. स. १९७५ ला चंद्रकांत शेटे यांनी प्रसिद्ध केले. चंद्रकांत शेट्ये हे प्रकाशक म्हणून सर्वांनाच परिचित आहेत. असे असले तरी ग्रामीण नाटक म्हणून 'अंगार' अर्थात 'डोंगरचा राजा' या नाटकाचा अभ्यास करता ते एक सामर्थ्यशाली, प्रतिभासंपन्न आणि स्वतंत्र शैलीने लिहिणारे लेखक आहेत. याची



Scanned by CamScanner

साक्ष नाटक वाचताना पटते. नाटकाच्या शीर्षकावरून हे स्पष्ट होते की, यात येणारा आशय हा डोंगरी भागातील असून तो नायक त्या भागाचा नायक आहे. अर्थात तो वारणा खोऱ्यातील डोंगरचा राजा आहे. जोतिबाचा डोंगर नजरेसमोर ठेवून जोतिबा देवाला साक्ष मानून आशयाची मांडणी केली आहे. एका सुशिक्षित तरुणाच्या जीवनात वाईट घटना घडते. कायद्याने त्याच्यावर अन्याय होतो. तो परिस्थितीने अन्यायाला विरोध करण्यासाठी दरोडेखोर डाकू होतो. तो गरिबांचा वाली आणि श्रीमंतांचा कर्दनकाळ ठरतो. वारणा खोऱ्यात डोंगरचा राजा म्हणून खाशा दरोडेखोराची ख्याती असते. धर्माचा भाऊ म्हणून सर्वत्र प्रसिद्ध होतो. या नाटकातील आशयाच्या कहाणी विषयी प्रा. चंद्रकुमार नलगे नाटकाच्या प्रस्तावनेत लिहितात :-

"एका दरोडेखोराच्या जीवनावर प्रकाश टाकणारे 'अंगार' अर्थात 'डोंगरचा राजा' हे रंगतदार जीवननाट्य आहे. खाशा या नावाच्या उमद्या सुशिक्षित पण दुर्दैवाने ज्याचे जीवन उद्ध्वस्त केले आहे अशा दरोडेखोर माणसाची ही रोमहर्षक चित्तथरारक तितकीच करुणरम्य कहाणी आहे."

या ठिकाणी हे स्पष्ट दिसते की, या नाटकातील दरोडेखोर हा सुशिक्षित आहे. तो इतरांसारखा अशिक्षित नाही. परिस्थितीने तो या वाटेवर आला आहे. शेवटी मात्र तो डी. आय. जी. असलेल्या स्वतःच्या बापाकडून मारला जातो.

खाशा ग्रामीण भागात वारणा खोऱ्यात परिस्थितीनुसार वेगवेगळ्या माध्यमातून आजही दिसतो. दरोडेखोर म्हणून नसले तरी त्या पद्धतीने वेगळे जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. ही या भागातील लोकांची एक सामाजिक समस्या म्हणून पहावे लागते. सत्य घटनेशी जवळीक साधणारे असे हे कथानक आहे. खाशा येथे डोंगरचा राजा म्हणून एक अंगार म्हणून वावरतो. डोंगरचा राजाप्रमाणे तो जीवन जगतो. शेवटी कोणाच्याही हाती न लागता स्वतःच्या बापाच्या बंदुकीच्या गोळीला बळी पडतो. तो ममतेने प्रेमापोटी माघार घेत नाही. येथे मृत्यू स्वीकारूनही खाशा जिंकतो व त्याचा बाप हारतो. असे हे सामाजिक आशय असलेले नाटक आहे. या नाटकाच्या आशयाविषयी प्रा. डॉ. एस. एस. भोसले म्हणतात :-

"खऱ्या अर्थाने खाशाच्या जीवन संघर्षाच्या चढ-उतारावर आकार घेणारे आणि खाशा बरोबरच संपणारे 'अंगार' अर्थात 'डोंगरचा राजा' हे नाटक सामाजिकतेचा आशय लाभल्यामुळे लक्षात राहते. त्यातले प्रसंग लेखकाने केलेला 'ग्रामीण' अर्थात 'प्रादेशिक' भाषेचा वापर यामुळे ते नाटकही त्या मातीशी इमान राखणारे वाटते."



Scanned by CamScanner

गोरगरीबांचा वाली म्हणून खाशा दरोडेखोर येतो. बापाची माया ममता याला तो बळी न पडता ताट मानेने राजासारखा मरण पत्करतो. शरणागती पत्करत नाही. कलेला दाद देणारा आणि कस्तुरीबरोबर लग्न करून संसाराची स्वप्न बघणारा खाशा परिस्थितीने दरोडेखोर झालेला आणि परिस्थितीनेच मारला जातो. या खाशाचा वंश कस्तुरीच्या पोटात वाढत असतो. तोही वाघासारखाच म्हणून कस्तुरी खाशाच्या शब्दाला मान देऊन त्याला सोडून नदीपलीकडे जाते. या नाटकात डी. आय.जी. याने खाशा ऑपरेशन यशस्वी केले म्हणून सरकारकडून सत्कार होणार असतो. पण आपणच आपल्या मुलाचा खून केला. या विचाराने तो अस्वस्थ होतो. येथे बाप लेक दोघेही आपापल्या भूमिकेशी ठाम राहतात. खाशा हा अन्यायाच्याविरुद्ध सत्यासाठी मरेपर्यंत लढतो. प्रसंगी तो नात्याचा विचार करीत नाही. म्हणून हे नाटक यशस्वी होते.

ग्रामीण भागात पाटलाने बाई ठेवणे हा प्रकार फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. हे कथाबीज घेऊन रा. रं. बोराडे यांनी इ. स. १९७९ साली 'पिकलं पान' हे ग्रामीण नाटक लिहिले आहे. या नाटकाचा आशय पाहता ग्रामीण भागात व मराठवाड्यात बाई ठेवण्याचा प्रकार जास्त दिसून येतो. कोणताही लेखक साहित्य निर्मिती करताना त्या त्या भागातील कथाबीज घेऊन साहित्य लिहित असतो. या नाटकाच्या कथाबीजाविषयी लेखक स्वतःच नाटकाच्या प्रस्तावनेत म्हणतो :-

'या नाटकाची कथावस्तू म्हणजे एक अस्सल गावरान बेणं आहे. हे नाटक एका रसरसत्या आणि मस्तवाल जिंदगीचा आणि त्या जिंदगीतून फुलणाऱ्या या खट्याळपणाचं नंबरी आविष्कार आहे म्हणूनच या नाटकातील विनोदही तितकाच खट्याळ आणि नंबरी आहे.''

याचा अर्थ असा नाही की इतर भागात बाई ठेवणे हा प्रकार नाही. तो आता कालानुरूप कमी होत आलेला आहे. कारण या नाटकातील तानाजी सुशिक्षित असल्याने त्याला गावाचा विकास महत्त्वाचा वाटतो. बाई ठेवणे हे वाईट आहे असे मानत असतो. पण ही गोष्ट इतरांना पटत नाही. परिणामी तानाजीला सपरंच पदाचा राजीनामा दयावा लागतो. तानाजीच्या विचाराने वागणाऱ्यांची संख्या दिवसेन्दिवस वाढत आहे. पाटील, इनामदार यांची हुकूमशाही कमी होत आहे. पूर्वी मात्र ही परंपरा खेड्यात होती हेही सत्य आहे. हे सांगताना काही ठिकाणी लेखकाने विनोदाचा वापर केला आहे. माणूस ६० वर्षाचा झाला तरी तो बाई ठेवण्याची भाषा करतो. हे या नाटकातून दिसून येते. म्हणून या नाटकाचे नाव 'पिकल पान' असे का दिले आहे



Scanned by CamScanner

याचे उत्तर शेवटी वाचकांना मिळते. मानाजी हा म्हातारा झालेला असतानाही तो हिराला ठेवतो. कारण त्याला घराण्याची इज्जत महत्वाची वाटते. हेच या नाटकाचे मुख्य आशयसूत्र आहे.

इ. स. १९८१ मध्ये गणेश हिर्लेकरांनी 'रक्ताचा टिळा' हे नाटक लिहिले. 'रक्ताचा टिळा' हे नाटकाचे शिर्षक वाचताक्षणी या नाटकात खून केलेला आहे. हे प्रथम दर्शनी लक्षता येते. मात्र हा 'रक्ताचा टिळा' कशासाठी आहे हे मात्र नाटक वाचल्यानंतर लक्षात येते. इस्टेटीसाठी भाऊबंदकीतून काका भावाचा व इतर अनेक लोकांचे खून करतो. त्याचा बदला घेण्यासाठी अनेकजण धडपडत असतात. सर्व गावकऱ्यांना या काकाच्या त्रासाला बळी पडावे लागते. जंबूर या गोष्टींना प्रतिकार करून धाकू कुंभार, शितू वाणी व मास्तर यांचे काकानी नाहक बळी घेतलेला असतो. लोकांना कमी पैसे देऊन व्याजापोटी अधिक वसूल करतो. चंदन व लाखण या दोन भावांची ताटातूट करून लाखणच्या हातूनच त्याच्या वडिलाचा खून करवितो. हे नाटक पूर्णपणे आर्थिक विषय/आशय व्यक्त करणारे असे आहे. सख्खा भाऊ पक्का वैरी असे आपण नेहमीच म्हणतो. याचेच प्रत्यंतर या ग्रामीण नाटकातून आपणास येते. काका भावाचा खून करून त्याची सर्व इस्टेट बळकावण्याचा प्रयत्न करतो. गावकऱ्यांवर हुकूमत गाजवू पहातो. अनेक वाईट मार्गाचा अवलंब करतो. अनेक मुलींच्या इज्जतीशी खेळतो. काकाचे सर्व काळे धंदे गावकऱ्यांना त्रास देणारे असतात. म्हणूनच जंबूर हा शेतकरी न्यायासाठी त्याला विरोध करतो. मात्र परिस्थितीने तो काकाच्या हातून मारला जातो. पैसा मिळविण्यासाठी आबाच्या मुलाला मारण्याचा प्रयत्न करतो. मात्र तो मुलगा वाचतो. पुढे तो डाकू लाखणसिंग होतो. याच्याच हातून शेवटी काकाचा मृत्यु होतो. काळा पैसा ईस्टेट मिळविण्यासाठी एका पाठोपाठ एक खून करीत असतो. पैसा हा सर्वस्व मानणारा काका समाजातील वाईट प्रवृत्तीच्या माणसांचा प्रतिनिधी म्हणून येतो. समाजात आजही असे पैशासाठी व ईस्टटीसाठी अनेकांचे खून झालेले पहायला मिळतात. हे वास्तव आपण नाकारू शकत नाही. परिस्थितीने लाखण दरोडेखोर होतो. पण सत्याचा विजय झाल्याने आणि अनेकांच्यावर झालेल्या अन्यायाचा बदला काकाचा खून करून रक्ताचा टिळा लावल्याने नाटकाचा शेवट सुखात्मक झाला आहे.

रमाकांत पायाजी यांनी या नाटकातून सुजाता या मुलीच्या जीवनाची व्यथा मांडली आहे. येथे मुलीचे आई, वडील जर मुलीला देहविक्रीसाठी पुढाकार घेत असतील तर इतरांनी काय करायचे? हा प्रश्न उपस्थित होतो. रूपेश व विकास



Scanned by CamScanner

सुजाताला यातून मुक्त करण्यासाठी गावाशी वैर करतात. पण सुजाता माघार घेते. परिणामी रूपेशवर मराठे मारेकरी घालतो. सुजाताचा भाऊ देवदत्त हा शिकलेला असून तो नोकरीनिमित्त बाहेरगावी असतो. तो फक्त भाऊबीजेदिवशी सुजाताकडे येतो. इतरवेळी तिची चौकशी करीत नाही. या ठिकाणी रक्ताची माणसे कसं दुर्लक्ष करतात, हे लेखक येथे मांडतो. जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी मिळवण्यासाठी परिस्थितीने सुजाता देह विक्री करते. जेव्हा देवदत्तला हे समजते तेव्हा तो बहिण भावाचे नाते तोडून कायमचा निघून जातो. सुजाताला दारू पिण्याचे व्यसन लागते. यामुळे ती असाध्य रोगाला बळी पडते. समाजाकडून तिला जगणं अवघड होते. ती शेवटी विष पिऊन आपली जीवन यात्रा संपवते. शेवटी ती देवदत्तला एक वेळ ताई म्हणून हाक मार अशी इच्छा व्यक्त करते. पण तो तिची शेवटची इच्छा पूर्ण करत नाही. येथे त्याचा निष्ठूरपणा दिसतो. शेवटी ती मरते आणि तो ताई म्हणून हाक मारतो. देवदत्त फक्त समानतेच्या गोष्टी बोलतो. पण स्वत: बहिणीसाठी काहीही करत नाही. असा हा विरोधाभास येथे दिसतो. या नाटकात सुजाताच्या जीवनाच्या कहाणीबरोबर शामकांतच्या भावाची प्रभातची कहाणी येते. तिची पत्नी दुसऱ्याचा हात धरून निघून जाते आणि त्याच्या जीवनाची होरपळ होते. तसेच रत्नाकरसारखे लोक या वेश्या व्यवसायाच्या आधारावर जगताना दिसतात. रूपेश व विकास समाज जागृती करून लोकांना अंधश्रद्धेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करताना दिसतात. सुजाताला औषधोपचार करून पुन्हा जीवनदान देण्यासाठी धडपडतो. मात्र सुजाता येथे आपण पुर्वजन्माचे काहीतरी पाप केले आहे. त्याचे हे फळ आपल्या वाट्याला आले असे समजून मृत्युला जवळ करते. येथेही तिची अंधश्रद्धा दिसते. एकूणच येथे शिक्षणामुळे माणूस अंधश्रद्धेतून बाहेर येताना दिसतो. पण त्याचे कोणी ऐकत नाही. परिणामी त्यांना समाजात असूनही ते काही करू शकत नाहीत. कारण त्यांची संख्या मोजकी असते.देवावर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या गावात जास्त असते. हे वास्तव नजरेआड करता येत नाही. त्यामुळे देवदासी प्रथा केव्हा बंद होणार याचे उत्तर मिळत नाही.

माणसांची नाती ही युगायुगांनी जोडलेली असतात. याची प्रचिती कमलकार बोरकरांनी इ. स. १९८७ सालच्या 'नाती युगायुगाची' या नाटकातून करून दिली आहे. या नाटकाच्या सुरुवातीलाच आशयाविषयी लेखक म्हणतो, 'जमिनदार आणि शेतकरी यांचा जबरदस्त संघर्ष तीन अंकी सामाजिक नाटक.'(पृ.१) यावरून हे स्पष्ट होते की, हे एक सामाजिक समस्या मांडणारे ग्रामीण नाटक आहे. शेतकरी



Scanned by CamScanner

आणि जमिनदार यांचे अस्तित्व हे ग्रामीण भागातच दिसते. हे मांडण्यासाठी लेखकाने रत्नागिरी जिल्ह्यातील एक खेडेगाव वाचकांच्या नजरेसमोर उभा करून आशय मांडला आहे.

'नाती युगायुगाची' या नाटकातून बोरकरांनी गरीब शेतकरी व त्याची शेतजमीन म्हणजे काळी आई यांचे नाते कसे आहे हे सांगून ही नाती युगायुगापासून चालत आलेली आहेत हे पटवून दिले आहे. उर्मट दुष्ट विचारांचा शेतकऱ्यांवर अन्याय करणारा कृष्णकांत बहिणीचा विचार न करताच रवीवर मारेकरी घालतो. या कृष्णकांतला धडा शिकविण्यासाठी व गावात दवाखाना सुरू व्हावा यासाठी किरण धडपडतो. पण तो गावकऱ्यांना मदत करत कृष्णकांतच्या बाजूने उभा राहतो. कृष्णकांतचा विरोध पत्करून विभा रवीवर प्रेम करते. त्याच्याशी लग्न करण्याचा निश्चय करते. जनार्दन हा मामेभाऊ असून तो वाईट कृत्ये करतो. त्यामुळे तो विभाला मुकतो. नंतर तो सदाच्या हातून मारला जातो. या सर्व घटनामुळे गावकरी त्रासतात व कृष्णकांतचा वाडा जाळण्याचा विचार करतात. त्याला ठार मारण्यासाठी पुढे सरसावतात. मात्र ५० हजार रुपये किरण त्याच्या घरातून दवाखाना सुरू करण्यासाठी चोरून ठेवल्याचे सांगतो. याप्रसंगी कृष्णकांतच्या स्वभावात बदल होतो. तो गावकऱ्यांची माफी मागतो. त्याच्या घेतलेल्या जमिनी परत देतो. दवाखाना सुरू करण्यास संमत्ती देतो. गावासमोर एक आदर्श माणूस म्हणून पुन्हा उभा राहतो. त्याच्या या कार्यामुळे समाजात शांतता निर्माण होताना दिसते. तसेच समाज जागृतीच्या दृष्टीने गावे सुजान बनत चाललेली आहेत. याची साक्ष पटते.

एकूणच या नाटकातून शेतजमीन आणि शेतकरी यांची नाती ही युगायुगाची असतात. हे लेखकाने सांगितले आहे. जमिनदार आणि शेतकरी याच्या संघर्षाबरोबरच जमिनदाराचे अनेक वाईट अत्याचार येथे दिसतात. हे करताना विविध पातळीवरील वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा येथे येतात. या संघर्षाबरोबरच येथे प्रेमाचाही विषय येतो. गावकऱ्यांच्या एकीचे बळ म्हणून कृष्णाच्या मनात परिवर्तन होते.

रमाकांत पायाजी यांनी जो देवदासीचा विषय 'एक पिंजरा रिकामा' या नाटकातून मांडला. तोच विषय देवदासी या शीर्षकाखाली नारायण अतिवाडकर यांनी मांडला आहे. १९८८ मध्ये 'देवदासी' हे नाटक लिहून अंधश्रद्धेची पाळेमुळे किती खोलवर रूजलेली आहेत हे पुन्हा सांगितले आहे.

भारतीय ग्रामीण समाज हा पूर्वापार धार्मिक आहे. त्यामुळे येथे धर्माच्या नावाखाली अनेक रूढी परंपरांची जोपासना केली जाते. या जोपासनेतूनच अंधश्रद्धा



Scanned by CamScanner

बळावली जाते. ही अंधश्रद्धा पूर्वी होती आणि आजही आहे. आपण २१ व्या शतकात वावरत असताना दुसरीकडे खेडेगावातून देवदासी सोडणे यासारखे प्रकार दिसून येतात. यातून एक दोन नव्हे तर अनेक मुलींचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. ही प्रथा केव्हा बंद होणार याचे उत्तर आजही मिळत नाही. कारण आजचा माणूस हा रूढी परंपरेवर विश्वास ठेवतो. यातूनच अंधश्रद्धेला अधिक उधान येते. आज अनेक खेडेगावात शिक्षणाचा प्रसार झालेला नाही. त्यामुळे या परंपरा जोपासल्या जातात. या लोकांना सत्य काय आहे याची जाणीव जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत अशा या प्रथा चालूच राहणार यात शंका नाही. प्रामुख्याने दलित समाजात हा प्रकार अधिक प्रमाणात दिसतो. त्यामुळे ग्रामीण भागात गावचे पाटील आणि हरिजन यांच्यात आजही संर्घष असलेला दिसतो. या नाटकात दादा हा मुंबईत दादागिरी करून तो गावाकडे येतो.तोही एका हरिजनाचा मुलगा असतो. या गावात रूढीने त्याच्या सर्व कुटुंबाची हत्या झाल्याने त्याचा सूड घेण्यासाठी तो परत गावात येतो. आपण महार आहोत हे सुरूवातीलाच सांगून आपल्या जीवनाची कर्मकहाणी सांगण्यास सुरूवात करतो. यातूनच पुढे देवदासी हा विषय येतो. कारण ही देवदासी या हरिजनातीलच एक पोर असते.

अंधश्रद्धेचा फायदा घेऊन ग्रामीण भागातील पाटील, इनामदार लोक गोरगरिबांचा, अशिक्षीत असल्याचा फायदा घेतात. स्वत:ची इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वत:च्या स्वार्थासाठी दुसऱ्याला बळी देतात. हे या नाटकातून दिसते. प्रामुख्याने समाजात देवदासी सोडणे हे प्रकार हरिजन समाजात दिसतात. या समाजात एखादी रूपवान मुलगी असेल तर तिचा उपभोग घेता यावा यासाठी तिच्यावर रूढीपरंपरेच ओझे लादून तिला देवदासी म्हणून सोडण्यास भाग पाडायचे आणि तिचा शरीर उपभोग घ्यायचा. यात त्या स्त्रीच्या मनाचा विचार केला जात नाही. हे मुख्य आशयसूत्र मांडले आहे. दादासारखे लोक समाजात पुढे आले तर नक्कीच देवदासी सोडणे या प्रथेला आळा बसेल यात शंका नाही. म्हणून समाजात जागृती होण्यासाठी या नाटकातून मांडलेला आशय योग्य पद्धतीने मांडलेला आहे. तो वाचकास विचार करायला प्रवृत्त करणारा आहे. अप्रत्यक्षपणे येथे शिक्षणाचे महत्व लेखकाने मांडले आहे. माणूस शिकला तर तो अंधश्रद्धेला बळी पडणार नाही. हे वास्तव आपण नाकारू शकत नाही. अंधश्रद्धेबरोबरच जातीयता नष्ट झाली पाहिजे. हेही लेखक येथे मांडतो. या अंधश्रद्धा निर्मूलनाचा परिपाक म्हणून अनेक संस्था कार्य करताना दिसतात. देवदासी प्रथेविरुद्ध आवाज उठवू पहातात. या प्रयत्नामुळे समाजात नक्कीच



Scanned by CamScanner

काही प्रमाणात अंधश्रद्धेला आळा बसून देवदासी सोडण्याच्या प्रथेला विरोध होईल यात शंका नाही. तसेच जातियताही कमी होईल अशी आशा आहे. या दृष्टीने सर्वांनीच पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.

वरील ग्रामीण नाटकांचा विचार करता या नाटकातून येणारी आशय सुत्रे, पात्रे, संवाद, भाषाशैली, प्रसंग, चित्रण व वातावरण निर्मिती या सर्व घटकांचा विचार करता ती ग्रामीण पातळीवरील दिसतात. विषयामध्ये विविधता असली तरी यातील आशयसुत्रे आजही काही भागात घडताना दिसून येते. नाटकातील समस्यांचे मूळ पाहिले असता प्रामुख्याने शिक्षण हेच दिसते. त्यामुळे या लोकांना सत्य काय आहे याची पारख करता येत नाही. आज समाजाचे स्वरूप बदलले असले तरी समस्या आहेत त्याच दिसतात. या समस्या जाणून घेण्यासाठी ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी, ग्रामीण कविता या वाङ्मय प्रकाराबरोबरच ग्रामीण नाटकांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


१. डाकू मानसिंग – कमलाकर बोरकर १९७५

२. अंगार – चंद्रकात शेट्ये १९७५

३. इनामदार – अण्णाभाऊ साठे १९७६

४. पिकलं पान – रा. रं. बोराडे १९७९

५. रक्ताचा टिळा – गणेश हिर्लेकर १९८१

६. एक पिंजरा रिकामा – रमाकांत पायाजी १९८४

७. देवदासी – नारायण अतिवाडकर १९८८


या शिवाय यांचे 'कर्दनकाळ' (१९७६), यांचे 'दरोडेखोर डाकू' (१९७९), यांचे 'जन्मदाता' (१९७७), यांचे 'ठिणगी' (१९८२), यांचे 'भाग्याचं कुंकू' (१९८६), यांचे 'रक्तिमा' (१९८७), 'जन्मठेप' (१९८०), यांचे 'आंधळेपण डोळसाचे' (१९८०), यांचे 'आघात' (१९८६) इत्यादी. या नाटकांचा ग्रामीण नाटकांमध्ये समावेश होतो.

◆◆



Scanned by CamScanner